# २१. समूहजीवनासाठी व्यवस्थापन





## सांगा पाहू

श्रद्‌धा, आयेशा आणि एमिली या तिघींच्या आईवडिलांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत सहलीला जायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी खास गाडी ठरवली. सहलीला निघायच्या दिवशी सकाळी सर्वजण बराच वेळ गाडीची वाट बघत राहिले, पण गाडी आलीच नाही. फोनवर चौकशी केल्यावर कळले, की सर्वजण कुठे थांबणार आहेत, हेच गाडीच्या चालकाला माहीत नव्हते. गाडी आल्यावर सर्वजण निघाले.

- कौटुंबिक सहलीत गोंधळ कशामुळे झाला असे तुम्हांला वाटते ?
- असा गोंधळ टाळण्यासाठी तुम्ही कोणता उपाय सुचवाल ?

कोणतेही काम करण्यासाठी किमान व्यवस्थापन आवश्यक असते. व्यवस्थापन म्हणजे काय ? आपण काम कसे करणार, कधी करणार याचा आराखडा तयार करणे ही व्यवस्थापनाची पहिली पायरी आहे. आपण जर काम इतरांबरोबर करणार असू, तर हा आराखडा अधिकच काटेकोरपणे करावा लागतो. कोणते काम कोणी करायचे हे निश्चित करावे लागते. ते काम कसे करायचे हे प्रत्येक व्यक्तीला समजावून सांगावे लागते. काम करणाऱ्यांमध्ये ताळमेळ राहावा याची खबरदारी घ्यावी लागते. प्रत्येकजण सोपवलेले काम नीट करत आहे की नाही यावर देखरेख करावी लागते. आपल्या कामासाठी किती पैसे लागू शकतात याचा अंदाज बांधावा लागतो. या सर्व गोष्टी नेमकेपणाने पार पडल्या तर काम पूर्ण होते. कामात एकाने जरी चूक केली किंवा कंटाळा केला, तरी काम नीटपणे पूर्ण होत नाही.

घरी पाहुण्यांना जेवायला बोलवले असेल तरीसुद्‌धा व्यवस्थापन करावे लागते. जेवायला कोणते पदार्थ बनवायचे, त्यासाठी कोणते सामान लागणार आहे ? ते सर्व सामान घरात आहे की विकत आणावे लागणार आहे ? पाहुण्यांचे आगत-स्वागत कसे करायचे? अशा खूप गोष्टी आईवडील बारकाईने ठरवत असतात. ठरवलेल्या गोष्टी पूर्ण करत असतात. सर्व गोष्टी व्यवस्थित ठरवल्या असतील आणि त्या ठरवल्याप्रमाणे सर्वांनी पार पाडल्या, तर कार्यक्रमही चांगला होतो. कार्यक्रम ठरवताना एखादी गोष्ट विसरली किंवा एखादे काम पार पाडायचे राहून गेले तर कार्यक्रमात गोंधळ होतो.

अशा छोट्या छोट्या कार्यक्रमांतसुद्‌धा जर व्यवस्थापन आवश्यक असेल, तर शाळा, गाव, जिल्हा, राज्य आणि देश अशा ठिकाणी व्यवस्थापन किती महत्त्वाचे असेल !



### माहीत आहे का तुम्हांला

अभ्यासाचे व्यवस्थापन केले, तर अभ्यासही चांगला होऊ शकतो. ते कसे करायचे ?

- रोजच्या अभ्यासाची वेळ निश्चित करा आणि ती काटेकोरपणे पाळा.
- प्रत्येक आठवड्याला अभ्यासासाठी करायच्या कामांची यादी करा. (उदा., परिसर अभ्यास प्रकरण ३ वाचणे किंवा अपूर्णांकांच्या बेरीज-वजाबाकीची गणिते सोडवणे इत्यादी.)
- यादीतील कामे ठरवल्याप्रमाणे पूर्ण करा.
- प्रत्येक विषयाच्या अभ्यासासाठी पुरेसा वेळ ठेवा.
- अवघड वाटणाऱ्या विषयांचा अभ्यास टाळू नका. तो अभ्यास आधी संपवा.
- मोकळा वेळ मिळाला तर त्याचा अभ्यासासाठी सदुपयोग करा.
- खेळणे, टीव्ही बघणे, झोपणे, विश्रांती यांसाठीही खास आणि निश्चित वेळ ठरवा. मात्र तेवढाच वेळ त्या-त्या गोष्टीसाठी द्या.



### सांगा पाहू

- तुमच्या वर्गाच्या व्यवस्थापनासाठी कोणती कामे तुम्हांला आवश्यक वाटतात?
- ती कामे पार पाडण्यासाठी तुमचे प्रतिनिधी तुम्ही कसे निवडाल?

वर्गाची स्वच्छता नीट झाली आहे ना ? वर्गात खडू आणि डस्टर आहे ना ? फळा स्वच्छ आहे ना ? हे नियमितपणे तपासण्याची जबाबदारी किंवा फळ्यावर सुविचार लिहिणे, वर्गात शिस्त राखणे यांसारखी कामे आपण वर्गप्रतिनिधीच्या माध्यमातून करतो. अशाच प्रकारे शाळेचे काम सुरळीत चालण्यासाठी मदत व्हावी यासाठी 'शाळा व्यवस्थापन समिती' तयार केली जाते.

शाळा व्यवस्थापन समितीमध्ये पालक, शिक्षक आणि स्थानिक पातळीवरील इतर काही तज्ज्ञ व विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश असतो. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्या अडचणी ही

समिती समजून घेते. या अडचणी दूर व्हाव्यात यासाठी मार्गदर्शन करते. शाळेच्या विकासासाठी योजनांची शिफारस करते. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या शाळेतील नियमित उपस्थितीवर देखरेख ठेवते. माध्यान्ह भोजन व इतर शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी मदत करते. अशा प्रकारे विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक चांगल्या प्रकारे विकास व्हावा यासाठी शाळा व्यवस्थापन समितीमधून शिक्षक आणि पालक एकमेकांच्या मदतीने प्रयत्न करतात.

- तुमच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीविषयी माहिती मिळवा.

### सांगा पाहू



- रस्त्यावर अपघात का होतात?
- वाहतुकीच्या नियमांचे पालन का केले पाहिजे?

शाळा नेहमी ठरावीक वेळेलाच का सुरू होते? शाळेत सर्व विषयांचे वेळापत्रक का बनवले जाते? रस्त्यावरून वाहने नेहमी डाव्या बाजूनेच का धावतात? असे प्रश्न तुम्हांला पडत असतील. समजा, शाळा सुरू होण्याची कोणतीच निश्चित वेळ नसेल तर काय झाले असते? कोणी कधीही शाळेत आले असते आणि घरी गेले असते. त्यामुळे अभ्यास कधी करायचा तेच समजले नसते. अभ्यासाचे वेळापत्रक नसते तर प्रत्येकजण वेगळीच पुस्तके आणि वह्या घेऊन शाळेत आले असते.

नियमांमुळे प्रत्येकाला समाजात कोणती गोष्ट कशी करायची याची दिशा मिळते. समाजातील प्रत्येकजण ठरावीक पद्धतीनेच वागणार आहे याची खात्री मिळते. उदाहरणार्थ, रस्त्यावरून गाडी चालवणारी प्रत्येक व्यक्ती डाव्या बाजूनेच जाणार आहे हे माहीत असल्यामुळे आपणही गाडी निर्धास्तपणे चालवू शकतो. मात्र समोरून येणारी व्यक्ती डाव्या बाजूने येणार आहे की उजव्या बाजूने, हेच आपल्याला माहीत नसेल, तर गाडी चालवताना आपणही गोंधळून जाऊ.

समाजात गोंधळ माजू नये आणि आपले समूहजीवन सुरळीत चालावे यासाठी नियम तयार केले जातात. पूर्वी नियम समाजातील चालीरीतींनुसार ठरत असत. आता नियम शासन बनवते. आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर आपण संविधान तयार केले. राज्यकारभार कसा करावा, समाजाची वाटचाल कोणत्या दिशेने व्हावी यांविषयीच्या तरतुदी संविधानात असतात. आपण निवडून दिलेले प्रतिनिधी त्यानुसार देशाचा कारभार पाहतात.

स्थानिक पातळीवरील कारभार 'स्थानिक शासन संस्थांच्या' माध्यमातून पाहिला जातो.




### सांगा पाहू

- तुमच्या भागात कोणती स्थानिक शासन संस्था काम करते ?
- तुमच्या घराच्या किंवा शाळेच्या आसपास त्याबद्दलच्या काही पाट्या (उदाहरणार्थ, वॉर्डचे नाव, आपल्या नगरसेवकांचे/महापौर/सरपंच आदींचे घर, ग्रामपंचायतीचे कार्यालय इत्यादी.) आहेत का ?


विहिरीवर पाणी भरणाऱ्या स्त्रिया


बाग


रस्त्यावरील दिवे



शहरातील कचरा गोळा करणारी गाडी

रोजच्या जगण्यातील अनेक वस्तूंसाठी आपण आपले कुटुंब किंवा शेजारी यांच्या व्यतिरिक्त इतर बाहेरील लोकांवर अवलंबून असतो. आपल्याला पिण्यासाठी, स्वच्छतेसाठी, शेतीसाठी आणि

जनावरांसाठी पाणी हवे असते. आपल्या परिसरात रोजच्या रोज जमा होणारा कचरा साफ करण्याची आवश्यकता असते. रस्ते बांधणे, रस्त्यावर पुरेसे दिवे असणे, शाळा, दवाखाने, सार्वजनिक बाग-बगीचे अशा आपल्या निरनिराळ्या गरजा असतात. यांसारख्या गरजा पुरवण्याची जबाबदारी आपल्या भागातील स्थानिक शासन संस्थेवर असते. त्यासाठी स्थानिक शासन संस्थांवर लोक त्यांचे प्रतिनिधी निवडून देतात.

## आपण काय शिकलो

- कोणतेही काम करण्यासाठी किमान व्यवस्थापन गरजेचे असते.
- सामूहिक कामांसाठी सविस्तर आराखडा आवश्यक असतो.
- आराखड्याप्रमाणे काम केले तर ते सुरळीत आणि वेळेत पार पडते.
- विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक चांगल्या प्रकारे विकास व्हावा यासाठी शाळा व्यवस्थापन समिती काम करते.
- लोकांना दैनंदिन सेवा पुरवणे व त्यांच्या अडचणी सोडविणे ही कामे स्थानिक शासन संस्था करते.

## स्वाध्याय

5F8CBJ

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. व्यवस्थापनाची पहिली पायरी कोणती आहे ?

२. नियम का तयार केले जातात ?

### (आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. कोणतेही काम करण्यासाठी किमान .................... आवश्यक असते.

२. काम करणाऱ्यांमध्ये .................... राहावा याची खबरदारी घ्यावी लागते.

३. स्थानिक शासन संस्थांवर लोक त्यांचे .................... निवडून देतात.

### (इ) घरी पाहुण्यांना जेवायला बोलावले आहे. त्याचे व्यवस्थापन तुम्ही कसे कराल ?

**उदा.,** जेवायला कोणते पदार्थ बनवायचे.

१. ......................................................................

२. ......................................................................

## उपक्रम

- तुमच्या दररोजच्या खेळाचे व अभ्यासाचे वेळापत्रक तयार करा. वेळापत्रकामुळे तुमचा अभ्यास वेळच्या वेळी होतो का याच्या नोंदी ठेवा.
- दिवसभराच्या कामाचे नियोजन करा. नियोजनामुळे तुम्हांला कोणते फायदे झाले याची चर्चा करा.
- आपल्या भागातील स्थानिक शासन संस्थांच्या प्रतिनिधींना वर्गात आमंत्रित करून विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्याशी चर्चा आयोजित करा.

* * *